Pune Police

# प्रेसनोट दि. २७/०१/२०१७

## '' पाटील इस्टेट, शिवाजीनगर, पुणे येथील ब्राऊन शुगर विक्री करणा-या कुख्यात इसमास त्याचे साथीदारासह अटक, त्यांचे ताब्यातून एकुण दोनलाख सत्तर हजार रुपयांचे ब्राऊन शुगर जप्त''

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

प्रजासत्ताक दिनाचे अनुषंगाने कोणतीही घातपात कारवाई किंवा अंमली पदार्थाची तस्करी होणार नाही या अनुशंगाने मा.पोलीस उपायुक्त तथा अप्पर पोलीस आयुक्त(अ.का.)पुणे शहर श्री. दिपक साकोरे यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रतिभा जोशी यांना मा.सहा.पोलीस आयुक्त , आर्थिक व सायबर गुन्हे शाखा श्री. संजय कुरुंदकर यांचे मार्गदर्शनात शहरात सतर्कतेने पेट्रोलींग करुन उचित कार्यवाही करणे बाबत आदेश दिलेले होते.

वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख प्रतिभा जोशी ,पोलीस निरीक्षक स्वाती थोरात यांचे दिमतीत अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील इतर अधिकारी / कर्मचारी खडकी पोलीस स्टेशन च्या हद्दीत पेट्रोलींग करत असताना पाटील इस्टेट झोपडपट्टी, गल्ली नं १,शिवाजीनगर येथे अंमली पदार्थाचे रेकॉर्डवरील गुन्हेगार अलीशेर लालमहंमद सौदागर व त्याचे दोन साथीदार यांना संशयावरुन पकडले असता १) अलीशेर लालमहमंद सौदागर वय-५३ वर्षे रा. पाटील इस्टेट झोपडपट्टी गल्ली नं.१ शिवाजीनगर पुणे याने आपल्या कब्जात एकुण ३० ग्रॅम ब्राऊनशुगर ,किंमत रुपये १,५०,०००/- व ब्राऊन शुगर विक्रीचे रोख २१,७१०/- तसेच अ.क्र. २) किशोर मधु अंबवने वय-२५ वर्षे रा. शिवाजीनगर पाटील इस्टेट गल्ली नं-१ पुणे याने आपल्या कब्जात एकुण १४ ग्रॅम ब्राऊनशुगर ,किंमत रुपये ७०,०००/- तसेच अ.क्र. ३) महेश मधु अंबवने वय-२३ वर्षे रा. शिवाजीनगर पाटील इस्टेट गल्ली नं-१ पुणे याने आपले कब्जात एकुण १० ग्रॅम कि.रु. ५०,०००/- असे तिघे मिळुन एकुन ५४ ग्रॅम ब्राऊन शुगर अनाधिकाराने बेकायदेशिररित्या, विनापरवाना,संगनमताने विक्रीकरीता जवळ बाळगले असता मिळाल्याने सर्व मिळुन **एकुण २,९१,७१०/- रु.च्या मालासह** मिळुन आलेने त्यांचे विरुध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८,(क),२१(ब),२२(ब) ,२९ प्रमाणे फिर्याद दिल्याने खडकी पो.स्टे. गु.र.नं. ३०२२/१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना दाखल गुन्हयातील तीन्ही आरोपींना आज ०१.०० वाजता अटक करण्यात आली आहे.

वरील कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रतिभा जोशी ,पोलीस निरीक्षक स्वाती थोरात,सहा.पोलीस निरीक्षक संजय ठेंगे,सहा.पोलीस निरीक्षक सुरेश साळी, अविनाश शिंदे, मोहन साळवी ज्ञानदेव घनवट,विनायक जाधव,रोहन चवरकर,प्रफुल्ल साबळे, अमित छडीदार, नितिन सानप,स्नेहल जाधव यांचे पथकाने केली.